MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात



परळी वेस, अंबाजोगाई येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भीम गीतांचा कार्यक्रमास उपस्थित केज मतदार संघाच्या कार्यसम्राट आमदार.नमिताताई अक्षय मुंदडा व ईतर सर्व मान्यवर...

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ अंक -२७ | सोमवार दि.१४ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -27 | MONDAY DT.14 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे, खा.बजरंग सोनवणे यांनी भूमिका स्पष्ट करावी

- आजी माझी आणि भावी आमदारांनी व महायुती, महाविकास आघाडीसह सर्व राजकीय पक्ष संघटनांनी बीड जिल्हा रेल्वे स्थानकाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाबाबत बद्दल आपलं मत व्यक्त करावं.
- अनुरथ वीर हे माजी सैनिक आहेत त्यांनी गेल्या पाच ते सहा दिवसापासून अन्न त्या आंदोलन केले होते आज उपोषण स्थगित करण्यात आले त्यांच्या वती बीड जिल्हा रुग्णालय मध्ये सध्या उपचार चालू आहे.
- अनुरथ वीर प्रशांत वासनिक प्रेम कांबळे अरुणाताई आठवले केके वडमारे यांचे रेल्वे स्थानकाच्या आंदोलनात मोठं योगदान.
- बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी वंचितचा ही पुढाकार अजय सरवदे अशोक हिंगे बबन वडमारे आंदोलनात सहभागी.
- बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघातील आमदारांनी बीडच्या रेल्वे स्थानकावर बाबत बाबासाहेबांच्या नावाला विरोध आहे किंवा नाही याची भूमिका ही स्पष्ट करणे गरजेचे.
- भिमशक्ती ताकदीने रस्त्यावर येतात पोलीस प्रशासनाची मोर्चाच्या वेळी पळापळ
- बीड शहरात मोर्चा ने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते सुभाष रोड बस स्थानक शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय नगर रोड वाहतूक कोंडी झाली.
- बीडच्या रेल्वेस्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्या









**बीड (प्रतिनिधी)- बीड येथील रेल्वेस्थानकाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या या मागणीसाठी गेल्या पाच दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनुरथ वीर यांचे उपोषण सुरू आहे. त्यातच आज आंबेडकरी जनतेने रस्त्यावर उतरून ही मागणी लावून धरली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून समस्त भीमशक्तीने रेल्वेस्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिलेच पाहिजे अशी आग्रही मागणी केली. हातात निळे झेंडे घेवून सहभागी झालेल्या आंदोलकांनी भर उन्हात मोर्चा काढला. आपल्या मागणीचे निवेदन त्यांनी प्रशासनाला दिले आहे. या संदर्भात तात्काळ निर्णय घ्यावा अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. या मोर्चात महिला, पुरूष आणि युवा वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता**

बीड रेल्वे स्थानकाच्या आंदोलनामध्ये माजी सैनिक अनुरथ वीर यांचे नाव सुवर्ण अक्षरात लिहिले जाईल.

माजी सैनिक अनुरत वीर यांनी गेल्या पाच ते सहा दिवसापासून अन्न पाणी त्याच करत आंदोलन केले आहे त्यांची प्रकृती खालवल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण चालू होते यावेळी आंदोलन करताना व अनुरत वीर यांच्या मुलीने यावेळी भाषण केले व शासनावरती लहान मुलीने सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाची मागणी केली यावेळी मात्र आंदोलनाच्या इतिहासामध्ये बीडचा रेल्वे स्थानकाला नाव लागल्यानंतर अनुरोध वीर यांचे नाव सुवर्ण अक्षरांमध्ये लिहिले जाईल हे एक माजी सैनिक आहेत आणि त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या नावासाठी जे आंदोलन उभे राहिले त्यांचे आंदोलनाला १८ पगड जातीतील लोकांनी पाठिंबा दिलेला आहे सध्या त्यांनी उपोषण स्थगित करत जिल्हाधिकारी यांनी पुढील कारवाईसाठी पत्रव्यवहार केल्यानंतर सध्या त्यांच्यावरती बीड जिल्हा रुग्णालयामध्ये उपचार चालू आहे त्यांची तब्येत सध्या व्यवस्थित आहे त्यामुळे अनुरथ वीर यांच्या पाठीशी खंबीरपणे १८ पगड जातीतील समाज बांधव उभा आहेत.

भगवान बाबा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे जिव्हाळ्याचा संबंध- भागवत तावरे

बीड जिल्हा रेल्वे स्थानकाला बीड शहरांमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी आज बीड शहरांमध्ये आक्रोश जन आंदोलन उभे राहिले जनसमुदायांमध्ये उभा राहिलेले आंदोलन आज मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले त्यासाठी लोकपत्रकार भागवत तावरे यांनी आपले भावना व्यक्त करत असताना भगवान बाबा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते असेही त्यांनी म्हटले यावेळी भागवत तावरे यांनी सांगितले की डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव लागेल म्हणून आम्ही या लढ्यामध्ये सदैव भीमसैनिकांसोबत उभे आहोत तर अठरापगड जातीचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहेत तर यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाला जो राजकारणी विरोध करेल त्याला आम्ही येणाऱ्या निवडणुकांमध्ये आडवं नक्कीच करू असाही इशारा भागवतावर यांनी दिला.

डॉ बाबासाहेब हे १८ पगड जातीचे श्रद्धास्थान असून भारताची घटना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिल्याच्या नंतर भारताचं सरकार आणि राजकारण हे संविधानिक रित्या चालतं जास्त संविधान लिहिणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर घटनाकार आजच्या नावाला जर राजकीय विरोध होत असेल तर येणाऱ्या २०२४ च्या निवडणुकीमध्ये दलित मुस्लिमांची मत हे काय हरामची कमाई आहे का असाही सवाल यावेळी आता दलित समाजाकडून राजकीय नेत्यांना होत असतानाच या राजकीय नेत्यांना आता दरीत समाजाला हात जोडण्याची वेळ आलेली आहे परंतु मतदान मागण्यासाठी हात जोडत असताना त्यांनी आता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी पुढाकार घेऊन एक गटा मतदान कोणत्या पक्षाला मिळेल याचा फायदा करून घेण्यासाठी अनेक राजकीय नेते तर कविता लावून स्वतःच्या बुद्धीचा पाडा वाचून त्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव राजकारणी नेत्यांच्या केंद्र व राज्य सरकारच्या बापाला ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावेच लागणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे बीडच्या रेल्वे स्थानकाला नाव देण्याबाबत एक आंदोलन झाले होते काही भीमसैनिकांनी यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचे रेल्वे स्थानकाला फलक ही लावण्यात आला होता परंतु त्या ठिकाणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पीआय बंटी वाडी यांनी त्या ठिकाणी जाऊन शासनाच्या आदेशानुसार कारवाई केली खरी परंतु आता बीड जिल्हा पोलीस प्रशासन हे नेमकं कोणाच्या इशाऱ्या वरती नाचत आहे असे आंदोलनामध्ये भाषण करताना भीमसैनिकांनी प्रशांत वासनिक के के वडमारे गोटू वीर अशोक हिंगे अजय सर्व दे प्रेम कांबळे यांनी म्हटले आहे की पोलीस प्रशासन नेमकं कोणाच्या इशारा वरती चालत आहे आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा लागलेला फलक हा बीड ग्रामीणचे पीआय बंटीवाड यांनी काढला आहे तर या अगोदर सुद्धा पोलिसांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक नाव देण्याच्या साठी काढण्यात येणाऱ्या मोर्चाला परवानगी न देता राजकीय दबावामुळे संबंधित मोर्च्याची परवानगी नाकारली आहे त्यामुळे पोलीस प्रशासन ही भीमसैनिकांच्या रडारवर आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची रेल्वे स्थानकाला नाव लावण्यासाठी आपण शेवटच्या श्वासापर्यंत लढा देणार आहोत असंही यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे शहराध्यक्ष प्रेम भैया कांबळे यांनी म्हटले आहे की कितीही जरी गुन्हे दाखल झाले तरी आम्ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव या रेल्वे स्थानकाला दिल्याशिवाय गप्प राहणार नाहीत.

# गेवराई तालुक्यातील वयोवृद्धांच्या आणि दिव्यांगाच्या अपेक्षांचा केला भंग?

## निवड समितीने निवडलेल्या बोगस लाभार्थ्यांची यादी पाहून तालुका झाला दंग! जिल्हाधिकारी पाठक साहेब, याप्रकरणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील श्रावणबाळ व संजयगांधी निराधार योजना खऱ्या अर्थाने ज्या वयोवृद्ध आणि दिव्यांग लाभार्थ्यांपर्यंत जाणे अपेक्षित होते. परंतु अशा खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत न जाता काही दलालांनी बोगस लाभार्थींच्या घशात ही योजना घातली आहे. यामुळे खरे लाभार्थ्यांना या योजनेपासून चक्क वंचित राहिले आहेत. नुकत्याच तहसील मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या याद्या पाहता गेवराई तालुक्यातील सर्व सामान्य आणि गोरगरीब जनता अक्षरशः चक्क झाली आहे. वयोवृद्ध आणि दिव्यांग अपेक्षित असताना देखील यामध्ये बोगस लाभार्थींची निवड केल्याने अनेक सुज्ञ नागरिकांनी खंत व्यक्त केली आहे. खऱ्या अर्थाने वयोवृद्ध आणि दिव्यांगांना जेव्हा काही सुज्ञ नागरिकांकडून ही बाब माहित झाली तेव्हा तालुक्यातील वयोवृद्धांच्या अपेक्षांचा भंग झाल्याच्या खेदजनक प्रतिक्रिया ऐकावयास मिळत आहेत. गेवराई तहसील मध्ये निवड



समितीने वयोवृद्धांना डावलून खोट्या कागदपत्रांचा संदर्भ खरा गृहीत धरून तरुणाईला प्रधान्य दिल्याने निवड समितीच्या या निर्णयाने गेवराई तालुक्यातील खरे लाभार्थी हैराण झाले आहेत. निवड समिती व गेवराई तहसीलच्या या चुकीच्या निर्णयामुळे अनेक खऱ्या वयोवृद्धच्या अपेक्षांचा भंग झाला आहे.

याविषयी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आक्षेप नोंदवत गेवराई तहसीलला निवेदन दिले असून, या निवेदनात म्हटले आहे की गेवराई तहसील कार्यालय येथे संजय गांधी आणि श्रावणबाळ योजनेची बैठक झाली असून या बैठकीच्या लाभार्थ्यांची निवड झाली ती अत्यंत चुकीच्या पद्धतीने झाली आहे. त्यामध्ये पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव तहसील कार्यालयात जमा केलेले असताना त्यांना वंचित ठेवण्याचे काम केले आहे. अनेक खरे निराधार व वृद्ध लाभार्थ्यांना या योजनेतून वगळण्यात आले असून एजंट मार्फत सादर केलेले बहुतांश अपात्र असणारे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे याची सखोल चौकशी करून निराधार वयोवृद्ध लाभार्थ्यांना न्याय द्यावा व त्यांचे प्रस्ताव मंजूर करावेत तसेच प्राप्त सर्व प्रस्तावांची छाननी प्रशासनातील अधिकारी यांच्या मार्फत करण्यात यावी. शासनाच्या नियम व अटीला या निवडीमध्ये डावलण्यात आले आहे. ही यादी खऱ्या लाभार्थ्यांची की नेत्यांची असा प्रश्न निवेदनात उपस्थित करण्यात आला असून खरे लाभार्थी निवडावेत आणि खोट्यात तरुण महिला पुरुषांची मंजूर करण्यात आलेली नावे तातडीने वगळावीत अशी रास्त मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला सितादेवी मंदीर ते जुना सावंतवाडी रोड या रस्त्याचे नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या रस्त्याच्या कामाचे भुमीपुजन ह.भ.प दिनेशानंद शास्त्री यांच्या शुभहस्ते झाले.यावेळी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे,जेष्ठ नेते नामदेव आण्णा काळे,ग्रामपंचायत सदस्य जयदीप काळे, मुकुंद काळे,नदिम मंडोला,रहिम भाई, रिझवान सय्यद,बबलू सय्यद,मधुकर काळे, कल्याण शिंदे,केतन रोकडे,बाजीराव काळे,दत्ता शिंदे, गोरख मोरे,श्रीधर घरत,शिवाजी शिंदे, रामदास बप्पा शिंदे,बंडु शिंदे, अशोक शिंदे,कैलास शिंदे,बबन तात्या शिंदे,बबलू भैय्या,सुजीत शिंदे,गणेश काळे, अशोक कानडे,प्रताप शिंदे,गोविंद शिंदे,शंकर घरत,पोपट जाधव,वैभव शिंदे,शुभम शिंदे,जग्गू शिंदे,महेश शिंदे,सुजित घरत, कुलदीप निर्मळ,पप्पु राऊत,नाथ गायकवाड,रंजीत जाधव,बबलु सावंत,प्रतिक कदम,मनोज शिंदे, धनंजय शिंदे, जयकुमार सालुगडे व इतर मान्यवर उपस्थित होते..!!

## पेठ बीड पोलीस ठाण्याच्या नसीर,सानप यांची उल्लेखनीय कामगिरी तलवार घेऊन फिरणाऱ्याला केले जेलबंद

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये सध्या हत्या कमरेला लावून गाडीमध्ये ठेवून स्वतःच्या वाहनांमध्ये ठेवत स्वतःच्या संरक्षण करण्याच्या किंवा दादागिरीच्या उद्देशाने अनेक गुंड प्रवृत्तीचे लोक सध्या हत्यार बंद म्हणून फिरत आहेत यामध्ये कोबीग ऑपरेशनची एक मोठी गरज असतानाच मात्र आता ठाण्याचे पोलीस हवलदार नजीर भाई व सानप यांनी गुप्त खापऱ्याच्या मार्फत एक जण पेडमिळ हद्दीमध्ये तलवार घेऊन फिरत असताना रंगीहात पकडले व त्याला जेल बंद करण्यात आले यांच्या धाडसी कौतुकाला पेड बीड मधील आणि नागरिकांकडून कौतुकाची थाप मिळत आहे यामध्ये पेठ बीड सह बीड शहरांमध्ये विधानसभेच्या तोंडावरती एक मोठा प्रश्न होणे गरजेचे आहे ठाण्याचे

पोहवा नसीर ,सानप याना मिळालेल्या माहिती नुसार बार्शी नाका येथे इसम नामे विशाल नवनाथ जगताप वय ३३ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर रा.भवानवाडी ता. जि.बीड मो.न.निमुळत्या आकारची टोकदार एका बाजुने धारदार पाते असलेली लोखंडी तलवार जुने वापरती किमंत



अंदाजे ५००-००/- रुपये ची तलवार मिळून आल्याने ४/२५ भा ह का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोहवा १३० शिंदे सिक्केतोड हे करत आहेत. पोलीस ठाण्याच्या सय्यद नसीर व सानप यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे बीड मधील जनता ही आनंद व्यक्त करत आहे त्यामुळे पोलीस हेड कॉन्स्टेबल नसीरभाई सानप यांनी ही कारवाई केली.

# राष्ट्रीय क्रांती सेनेचा दि. १४ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

## मतदार संघातील जनतेच्या ज्वलंत मागण्यासाठी राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांच्या नेतृत्वात धडक मोर्चाचे आयोजन

माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव, धारूर, वडवणी या प्रत्येक तालुक्याला एक हजार कोटीचे पॅकेज देऊन पंचतारांकीत औधोगिक क्षेत्र निर्माण करून मोठ मोठे उद्योग आणण्यात यावे तसेच रामगीरी महाराज व नितेश राणे यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात यावी, ओबीसी व मुस्लिम समाजाला लोकसभेत व विधानसभेत राजकीय आरक्षण देऊन एस.सी. एस.टी. च्या धरतीवर जागा आरक्षीत करण्यात याव्यात या मागण्यांसाठी दि. १४/१०/१०२४ रोजी राष्ट्रीय क्रांती सेनेचा उपविभागीय कार्यालय माजलगाव येथे धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांच्या नेतृत्वात होणारा असून या मोर्चास हाजोरोच्या संखेने ऊपस्थीत राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

माजलगाव मतदार संघा मध्ये पंचतारीकी औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यासाठी मोठ मोठे उद्योग आणण्यात यावे. म्हणजे येथील सुशिक्षित बेरोजगार, ऊसतोड कामगारांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होईल. व येथील सुशिक्षित बेरोजगारांचे व ऊसतोड मजुरांचे पर जिल्ह्यात परराज्यात स्थलांतर होणार नाही. यासाठी राष्ट्रीय क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष परमेशवर मुंडे याच्या नेतृत्वाखाली सरकारने विशेष पॅकेज द्यावे. या साठी धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. माजलगाव मतदारसंघा मध्ये सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम नसल्यामुळे बेरोजगार तरुणांची फार मोठ्या प्रमाणात संख्या वाढत चालली आहे. माजलगाव मतदारसंघात अंदाजे दीड लाख ते एक लाख सत्तर हजार लोक ऊस तोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक राज्यासह इतर राज्यामध्ये स्थालांतरीत होतात. तसेच येथील बेरोजगारांना टेकनिकल कुशल कारागीर आणि अकुशल



कारागीर यांना पुणे, सुरत, याठिकाणी पोटाचाउदारगिवाह करण्यासाठी कामाला जावे लागत आहे. माजलगाव मतदारसंघात औरंगाबाद सारखी पंचतारांकीत औद्योगक क्षेत्र निर्माण करण्याची गरज आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये औद्योगक क्षेत्र निर्माण करण्यात

यावे. माजलगाव मतदारसंघात स्थायिक उद्योजकांना ५०% उद्योग निर्माण करण्यासाठी अनुदान देण्यात यावे. बाहेरून येणाऱ्या उद्योजकांसाठी विज, जी.एस.टी., इन्कम टॅक्स टॅक्स व कमी दरात त्यांना औद्योगिक क्षेत्रातील जमीन उपलब्ध करून देण्यात यावी. त्यामळे मोठे उद्योजक, स्थागिक उद्योजकांना उद्योग उभारण्यासाठी प्रशिक्षण फ्री मध्ये उपलब्ध करूण देण्यात यावे. मुस्लिम ओ.बी.सी. समाजाला विधानसभा व लोकसभा एस.सी.एस.टी. च्या धरतीवर राजकीय आरक्षण देऊन लोकसंखे नुसार लोकसभा व विधानसभा आरक्षित करण्यात याव्यात. यासाठी माजलगाव मतदारसंघात तिन्ही तालुक्याला प्रत्येकी एक एक हजार कोटीचेपॅके देण्यात यावे. टोटल मतदारसंघात तीन हजार कोटीचेपॅकेज राज्य व कें द्र सरकारने द्यावे. वरील मागण्यांचा सकारात्मक विचार सरकारने करणे, अत्यंत गरजेचे आहे. जिल्ह्यातील वाढत चाललेली गुन्हेगारी बेरोजगारी, मागासलेपणा, आत्महत्येचे वाढलेलेप्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा पूर्णतः हा शेतीवर अवलंबून असल्यामुळे औद्योगगक क्षेत्र निर्माण केल्यास त्याचा मोठा फायदा शेतकरी व तरुण बेरोजगार टेक्निकल कुशल अकुशल कामगार स्थानिक उद्योजक यांना होणार आहे. अन्यथा या ज्वलंत मागण्यांचा सकारात्मक विचार न केल्यास दि.१४/१०/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. आंबेडकर चौक ते माजलगाव तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा राष्ट्रीय क्रांती सेनेचच्या वतीने संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे, शेख यावर जिबरान,शेख खाजा, रिहान चोधरी,रवी देशमुख,श्रीराम मुंडे,दत्ता नागरगोजे, सुहास मुंडे, नितीन मुंडे, संतोष नागरगोजे, अण्णा मायकर भागवत मुंडे,यांनी दिला आहे. परमेश्वर मुंडे हे सर्वच ऊमेदवारान पेक्षा वेगळे वाटतात ते मंतदारसंघाचे विकासाचे व्हिजन सागतात ते निष्कलंक असल्यामुळे ओबीसी समाजाचा पाठीबा त्याना मिळु शकत्तो सर्वच जाती धर्माला बरोबर घेऊन मंतदारसंघात परिवर्तन ते करुतील

# ६८ वा धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त सम्राट अशोक विहार शिरसाळा येथे

## भदंत महाविरो यांची धम्मदेशना संपन्न

शिरसाळा । प्रतिनिधी

६८ व धम्मचक्र परिवर्तन दिन निमित्त .भदंत महाविरो प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध. चक्रवती सम्राट अशोक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा ना पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी आयु. रोहिदास आरसुळे आय.मधुकर किरवले आयु.सुभाष चोपडे आयु.अमोल किरवले आयु.अमोल साळवे यांच्या हस्ते पुष्प दीप व दुपाने अभिवादन करण्यात आले. यशोधरा महिला मंडळांनी याचना केल्यानंतर भदंत महाविरो यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील देऊन सुरुवात करण्यात आली. भदंत महाविरो उपस्थितांनी धम्मदेशना देताना तथागतांचा धम्म अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितला. ते म्हणाले की जीवन हे क्षणभंगुर आहे ज्याला सुखाने मारायचे आहे त्याने सुखाने जगले पाहिजे बौद्ध म्हणून जगताना आपली फार मोठी जबाबदारी असून आपण वागण्यातून इतरांसमोर आदर्श निर्माण केला तर धम्मचक्र अधिक वेगाने गतिमान होईल असे या धम्मदेशनातून सांगितले आहे. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन. आयु. साहेबराव किरवले व प्रस्ताविक. प्राध्यापक .दयानंद झिंजुर्डे यांनी केले यावेळी डॉ.



बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटीचे अध्यक्ष .अच्युत बाप्पा फिरवले यांनी सर्वांना खीर दान केले. याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे सदस्य . व यशोधरा महिला मंडळ व मोठ्या प्रमाणात उपासक उपासिका उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित माजी सरपंच व हे विहार ज्यांच्या प्रयत्नातून दिसायला लागलेला आहे श्री राम किरवले . व लोकाशाचे पत्रकार मिलिंद चोपडे .दैनिक आरंभ चे पत्रकार बापू किरवले . व रणजीत रोडे .लखन किरवले या सर्वांनी या धम्मदेशना सांगताना शांतपणाने आचरणात घेतली आहे. यानंतर खीर वाटप करून हा कार्यक्रम संपला असे जाहीर करण्यात आले.



# धनगर समाज संघर्ष समिती बीड जिल्हा युवक जिल्हाध्यक्ष पदी विजय तांदळे यांची निवड

बीड । प्रतिनिधी

धनगर समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष पद्मश्री डॉ, विकास जी, महात्मे यांच्या आदेशाने, तेलगाव येथील विजय कांता तांदळे यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेऊन, नागपूर या ठिकाणी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निवासस्थानी, धनगर समाज संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मश्री डॉ, विकास महात्मे, यांच्या हस्ते, विजय तांदळे यांना बीड धनगर समाज संघर्ष समितीच्या बीड जिल्हा युवक जिल्हाध्यक्षपदी पदी निवड करण्यात आले आहे व नियुक्तीपत्र देण्यात आले, यावेळी प्रमुख धनगर समाज पदाधिकारी यांची खूप महत्वपूर्ण बैठक व योग्य निर्णय संदर्भात बैठक पार पडली, यावेळी आनंद बनसोडे, ज्ञानेश्वर परदेशी, अमन कुंडगीर, आदी पदाधिकारी उपस्थित होते, यावेळी विजय तांदळे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहेत.

# संत बाळूमामा जन्मोत्सव सोहळा पिठ्ठी येथे उत्साहात होणार साजरा

## १५ ऑक्टोंबर रोजी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सोहळ्यात सहभागी व्हावे

पाटोदा । प्रतिनिधी

श्री संत सद्गुरू बाळुमामा यांचा जन्मोत्सव बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथे भव्य उत्साहात साजरा होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १५ ऑक्टोंबर वार मंगळवार रोजी भव्य जयंती उत्सव पिठ्ठी नगरीत साजरा होणार असून भव्य कीर्तन महोत्सव चे आयोजन केले गेले आहे.

जगाचा मालक श्री संत सद्गुरू बाळुमामा यांचा महिमा पूर्ण देशात आपणास पहावयास मिळत आहे. त्यांच्या अनेक पालख्या विविध भागात फिरत असतात त्यांची मेंढरं सांभाळण्यासाठी दूर दूर वरून अनेक भाविक भक्त येत असतात.सेवा करतात. जगाच्या मालकाचा उघडा पसारा जेथे जाईल तिथे मामाचा दरबार भरतोच. यावर्षी पिठ्ठी वासियांचे भाग्य असे की, जन्मोत्सवाच्या तोंडावर संत सद्गुरु बाळूमामा देवालय आदमापूर पालखी क्रं - ९ चे आगमन नगरीमध्ये झाले आहे.भव्य कीर्तन महोत्सवाची सुरुवात ०९ ऑक्टोंबर ला सुरू झाली असून येत्या १५ ऑक्टोंबर ला मामाचा जन्मोत्सव साजरा होणार आहे. त्यामुळे पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ भाविक भक्तांनी मामाच्या दरबारी येऊन जयंती उत्सवाच्या आनंदाच्या सोहळ्यात सहभागी व्हावे.

श्री संत सद्गुरू बाळुमामा यांचा जन्मोत्सव बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथे भव्य उत्साहात साजरा होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १५ ऑक्टोंबर वार मंगळवार रोजी भव्य जयंती उत्सव पिठ्ठी नगरीत साजरा होणार असून भव्य कीर्तन महोत्सव चे आयोजन केले गेले आहे.



# वैचारिक बैठक प्रगल्भतेने विकसित करणाऱ्या मित्राला वाढदिवसाच्या शुभेच्छा

नंदकिशोर मुंदडा हे माझे जुने मित्र. अगदी शाळेत असताना पासुनचे. दोघांत बयाचे अंतर असून नसल्यासारखेच ! कमी अधिक एखादे वर्षे. त्यामुळे दोघे ही एकमेकांना सर्वार्थान ओळखणारे! सुरुवातीच्या काळात दोघांचा राजकीय प्रवेश एकाच नेतृत्वाखाली झालेला. जो पर्यंत काही कळत नव्हतं तो पर्यंत नेत्यांसाठी राजकारण केलं. पुढं दोघांच्या कामाची दिशा बदलली. नंदकिशोर मुंदडा राजकारणात स्थीर झाले आणि मी पत्रकारितेत. आज दोघं ही आपापल्या क्षेत्रात समाधानी आहोत, ही आनंदाची आणि त्या ही पेक्षा समाधानाची बाब आहे.

आज दसरा ! नंदकिशोर मुंदडा यांचा वाढदिवस ! दोन दिवसांपूर्वी फेसबुकने त्यांच्या वाढदिवसाची आठवण करून दिली आणि कालपासूनच नंदकिशोर मुंदडा यांच्या वेगळेपणावर काही तरी लिहावं असं वाटू लागलं. खरं तर आम्ही दोघं गेली अनेक वर्षे एकत्र असलो तरी ते ज्या राजकीय पक्षात बावरतात त्या राजकीय पक्षाचा गमचा गळ्यात घालून मी त्यांच्या उमेदवाराचा कधीच प्रचार केला नाही. पत्रकारितेत काम करण्यास सुरुवात केली, तेंव्हापासून आजपर्यंत तरी मी माझे राजकीय जोडे बाहेर काढून ठेवले आहेत. पत्रकारीतेत काम सुरु केले तेंव्हापासुन आज पर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाचा कार्यकर्ता व समर्थक म्हणून मी जाहीरपणे वावरलो नाही. मात्र राजकारणात सक्रिय असणाऱ्या माझ्या राजकीय मित्रांना राजकारणाच्या ही पलिकडे जाऊन मित्र म्हणून त्यांची राजकीय शक्ती वाढवण्यासाठी जिथं जिथं मला मदत करता येईल तिथं तिथं प्रामाणिकपणे मदत करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

नंदकिशोर मुंदडा हे गेली अनेक वर्षे राजकारणात सक्रिय आहेत, त्यामुळे त्यांना अनेक कार्यक्रमास उपस्थित राहून वेगवेगळ्या विषयांवर भाषणं करावी लागतात. त्यातील अनेक भाषणं सामाजिक विषयांशी निगडित असतात. अशा भाषणात राजकारणात सक्रिय राहुन ही राजकारणात सुरु असलेल्या अनिष्ट प्रथा विरुद्ध जाहीर भाष्य करणे हे खरं तर अवघड काम आहे. पण नंदकिशोर मुंदडा हे काम अगदी सहज आपल्या ओघवत्या शैलीत लिलया पार पाडतात. राजकारणात राहुन ही मतदान प्रक्रियेत सुरु असलेल्या अनिष्ट प्रथे विरुद्ध, शासकीय कार्यालयात सुरु असलेल्या भ्रष्ट व्यवस्थे विरुद्ध, कार्यकर्त्यांच्या वाढत चाललेल्या अपेक्षे विरुद्ध आणि आता पक्षाची विभागणीच जातीजातील ठेकेदारांनी केलेल्या काळात या विषयावर बोलणं हे तसं खुप अवघड काम आहे. या सर्व सिस्टीम च्या विरोधात बोलत असतानाच, ही सिस्टीम सुरळीत करण निकोप समाज वाढीसाठी कसं आवश्यक हे समोरील लोकांच्या मनाचा ठाव घेत सांगणं हे खुप अवघड काम आहे. आणि हे काम नंदकिशोर मुंदडा आपल्या भाषणातून कोणालाही न दुखावता सहज साध्य करतात. आपल्या सभोवतालील परिस्थितीचा सखोल



अभ्यास आणि आत्मियता असल्याशिवाय हे असं बोलता येत नाही असा माझा अनुभव आहे. हे बोलण्यासाठी नुसता अभ्यास आणि आत्मियता असून ही चालत नाही तर प्रचंड वैचारीक प्रगल्भता ही लागते. आपली वैचारिक प्रगल्भता विकसीत करुन लोकांच्या हृदयाचा ठाव घेत बोलण नंदकिशोर मुंदडा यांना आता सहज जमू लागलं आहे हे विशेष अभिनंदनीय आहे. नंदकिशोर मुंदडा यांचा आज पर्यंतचा प्रवास हा तसा थक्क करुन सोडणारा आहे. आजपर्यंत त्यांनी स्वतः एक ही निवडणुक लढविली नसली तरी निवडणुक यंत्रणा राबविण्याचे त्यांचे कौशल्य अफलातुन आहे. सर्वसामान्य परिस्थितीतुन पुढे येवू राज्यातील पाचव्या स्थानापर्यंत ची मजल मारणे हे सोपे काम नाही. त्या पदापर्यंत डॉ. सौ. विमल मुंदडा यांच्या माध्यमातून नंदकिशोर मुंदडा यांना पोहोचता आलं. या नंतर राजकारण संपत आल्याची भाषा करणाऱ्या लोकांच्या नाकावर टिच्चून पुन्हा राजकारणात ताठ मानेने उभा राहणे ही सोपं नाही. यासाठी फार मोठी राजकीय तपस्या करावी लागते. प्रसंगी मतदारसंघातील सामान्य लोकांच्या गळ्यातील ताईत ही व्हावे लागते. यासर्व गोष्टी कसलाही अहंकार न दाखवता गेली ४० वर्षे नंदकिशोर मुंदडा हे करीत आहेत. आपल्या या कौशल्याच्या जोरावरच पाच वर्षांपूर्वी त्यांनी राजकारणात अगदी नवख्या असलेल्या आपल्या सुनेला सौ. नमिता यांना विधानसभेत काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली. एवढेच नव्हे तर मागील पाच वर्षे सातत्याने आ. सौ. नमिता मुंदडा यांना योग्य मार्गदर्शन करीत एक सशक्त आणि अभ्यासू आमदार बनवण्याचा ही प्रयत्न केला. आज वाढदिवसाच्या निमित्ताने नंदकिशोर मुंदडा आणि त्यांच्या परिवाराची अशीच राजकीय प्रगती होवो. राजकारणा व्यतिरीक्त वैयक्तिक नंदकिशोर मुंदडा यांच्या मध्ये विकसित होणारी वैचारिक प्रगल्भता अधिक विकसित होवो, त्यांना उत्तम आरोग्य, सुख, शांती लाभो या सदिच्छा! वाढदिवसाच्या शुभेच्छा मित्रा!-

सुदर्शन रापतवार-अंबाजोगाई





**आहेर वडगाव येथे कृषिकन्यानी शेतकऱ्यांना दिले दशपर्णी अर्क तयार करण्याचे मार्गदर्शन**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिकन्या लिपाक्षी आघाव,आरती फड, वर्षदा कव्हर, वैष्णवी शितोळे,प्राची भोंडे,प्राची कांबळे ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषी औद्योगिक उपक्रम २०२४-२५ अंतर्गत कृषिकन्यानी दशपर्णी अर्क कसा तयार करायचा या संदर्भात गावातील शेतकरी वर्गाला सविस्तर माहिती दिली.महागड्या कीटकनाशकांचे अनेक दुष्परिणाम समोर येत आहे.जमिनीचा पोत बिघडण्यापासून तर मानवी जीवास हाणीकारक ठरणाऱ्या कीटकनाशकांचा वापर टाळून त्याला पर्याय म्हणून दशपर्णी अर्काचा वापर करण्याचा सल्ला कृषिकन्यानी दिला.दशपर्णी अर्क हे उत्तम प्रतीचे किडनाशक, बुरशीनाशक व टॉनिक इत्यादी सर्वच प्रकारचे कार्य करते. या संदर्भात सविस्तर माहिती दिली. यासाठी कृषि शास्त्र विभागाचे विषयतज्ञ ओ. एन. राऊत सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच या अभ्यासदौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. बी. तांबे सर, प्राचार्य श्री ए. यु. सानप सर, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. जी. मोरे सर, कार्यक्रम अधिकारी व्ही. बी. शिंदे सर आणि महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वर्गाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले..**

# केज मतदार संघातील सात रस्त्यांची दर्जोन्नती

केज । प्रतिनिधी

केज मतदार संघातील सात रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. यापैकी सहा जिल्हा मार्गांना आता राज्य मार्गाचा दर्जा मिळाला असून इतर जिल्हा मार्गातील एका रस्त्यास प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा देण्यात आला आहे. आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. जिल्हामार्गाचा दर्जा मिळालेले रस्त्यामंध्ये नाश्रा- इंजेगाव से राममा ५४८ 'बी' ते देशमुख टाकळी पांगरी नागापूर साकुड अंबाजोगाई ते रामा-२३५ रस्ता (एकूण ९ किमी) यांचा समावेश आहे.

ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी दळणवळण प्रभावी करण्याच्या हेतूने रस्तेनिर्मिती आणि दुरुस्तीकडे आ. मुंदडा यांनी मतदार संघातील काही रस्त्यांची दर्जोन्नाती करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर आता सात रस्त्यांची दर्जोन्नती झाली आहे. त्यानुसार २०९ किलोमीटर लांबीच्या सहा जिल्हा मार्गांना राज्य मार्गाचा तर इतर जिल्हा मार्गातील ९ किमीच्या एका रस्त्यास प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा देण्यात आला आहे.



यामुळे रुंदी वाढून रस्ते प्रशस्त होणार असल्याने वाढत्या वाहतुकीसाठी सोयीचे ठरणार आहे. त्यासोबतच वेळोवेळी या रस्त्यांच्या दुरुस्तीकामाच्याही निविदा निघणार

असल्याने नागरिकांना कायमस्वरूपी दर्जेदार रस्ते उपलब्ध होऊ शकणार आहेत. राज्यमार्गाचा दर्जा मिळालेल्या रस्त्यांमध्ये प्रजिमा-५२ बोधेगाव ते राक्षसवाडी भावठाणा धावडी डोंगरपिंपळा- चनई ते रा.मा. २११ मोरेवाडी ते रामा-५६ ते राममा ५४८ 'डी' ते अंबाजोगाई गीत्ता-जवळगाव रामा २२१ ते लिंबगाव-हातोला ते प्रजिमा-५७ रस्ता (एकूण २५.१० किमी), प्रजिमा-१८ ते धनेगाव-नायगाव सौंदना ईस्थळ- आपेगाव- देवळा धानोरा (बु) रस्ता (एकूण २१ किमी), राममा ६१ ते खरात आडगाव ते टाकळी आनंदगाव राममा-३६१ दिंद्रुड आडस होळ- राममा- ५४८ 'डी' ते बोरीसावरगाव- ईस्थळ प्रजीमा-४५ जिल्हा सरहद रस्ता (एकूण ५० किमी), प्रजिमा-७६ देवगाव विडा शिंदी फाटा ते येवता- कोळवाडी- तरणळी ते राममा-५४८ सी रस्ता (एकूण २५.४ किमी), राममा-२३२ चिखलबीड- जिवाचीवाडी- लव्हरी कानडीमाळी- केज राममा ५४८ 'डी' ते सोनीजवळा- आनंदगाव- पैठण रामा-६४ रस्ता (एकूण ४९ किमी), राममा २२२ से दहिफळ (वड) देवगाव राममा-५४८ 'डी' ते रामा-६४ शिरूरघाट ते पिट्टीघाट ते प्रजिमा- ४० जिल्हा सरहद रस्ता (एकूण ३९.४ किमी) यांचा समावेश आहे.

# मोंढा रोडवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने नावाचा बोर्ड

## लावण्यास बीड नगर परिषदचे मुख्यधिकारी व बांधकांम अभियंता यांना का विसर पडला. - प्रा.सनी विष्णु वाघमारे

बीड । प्रतिनिधी

सविस्तर वृत्त असे की, प्रभाग क्रः- २ (डउ राखीव) मोंढा रोड गेल्या अनेक वर्षापासून सदरील रस्ताची अवस्था अत्यंत वाईट परस्थिती झाली आहे.मोंढा रोड हा कृषी उत्पन्न बाजार समिती ,एम.आय.डि.सी, खंडेश्वरी मंदिर देवस्थान अनेक ठिकाणी हा रस्ता जोडला आहे.बीड जिल्हा प्रशासनाने लोकाच्या हिताच्या प्रश्न सोडवून या संकटातून मुक्त केले आहे.याबाबत मी बीड जिल्हा प्रशासनाची मनःपुर्वक आभार व्यक्त करतो.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार सन २०२४-२५ योजनेतून प्रभाग क्रः- २ (डउ राखीव) मोंढा रोड शिव-शारदा बिल्डिंग ते जिजामाता चौक ते संत सावतामाळी चौक ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंत रस्त्याच्या कामासाठी ४ कोटी २० लाख रुपये निधी देण्यात आला.सदरील काम हे समर्थ कन्ट्रक्शनचे ठेकेदार पाठक नामक व्यक्तीला देण्यात आला.

परंतु लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजना नावाचा बोर्ड





लावण्यास बीड नगर परिषदचे मुख्यधिकारी व बांधकांम अभियंता यांना का विसर पडला. का जाणीवपुर्वक नावाचा बोर्ड टाळण्यात आला ? याठिकाणी मा.मुख्यधिकारी साहेब,बांधकांम अभियंता साहेब ,पाठक नामक ठेकेदार साहेब यांचा जो काही हेतू असेल तो मी याठिकाणी साध्य होऊ देणार नाही. मा.मुख्यधिकारी साहेब,बांधकांम अभियंता साहेब याप्रकाराला खतपाणी घालत तर नाहीत ना ? मी या प्रसिध्दातून माध्यमातून संबंधित अधिकारी व ठेकेदारास विनंती करतो की, आपण दोन दिवसात तीन ठिकाणी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने नावाचा बोर्ड लावण्यात यावा.अन्यथा मी बीड नगर परिषद कार्यालय येथे आंदोलन करणार आहे.



**पिंपळगव्हाण (ता.केज)**

**पिंपळगव्हाण येथील जागृत देवस्थान असलेल्या श्री हनुमान मंदिराच्या १० लक्ष रुपये खर्चून उभारल्या जाणाऱ्या सभामंडप आणि विविध विकासकामांचे भूमिपूजन शुभारंभ केज मतदार संघाच्या आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच गुरुवर्य ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे , ह.भ.प.गुरुवर्य अर्जुन महाराज लाड, ह.भ.प.गुरुवर्य वासुदेव महाराज गायकवाड या सांप्रदायिक क्षेत्रातील सन्माननीय व्यक्तीमत्वांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या सभामंडपामुळे मंदिरातील विविध धार्मिक कार्यक्रमांना एक हक्काची जागा उपलब्ध होणार आहे.यानिमित्ताने ग्रामस्थांशी संवाद साधताना मतदारसंघातील विविध देवस्थानांच्या विकासासाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीचा आणि प्रगतीपथावर असलेल्या कामांचा आढावा दिला. याप्रसंगी भाजपा तालुका अध्यक्ष भगवानराव केदार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक नेताजी पापा शिंदे, शरद इंगळे ,पिंपळगावचे सरपंच सचिन गायकवाड,सारणीचे सरपंच राहुल ओव्हाळ,उमरीचे सरपंच अमोल मुळे, उपसरपंच शेलाजी घोळवे, ग्रामपंचायत सदस्य प्रा. उद्धव घोळवे, विनायक घोळवे, नितीन देशमुख, विकास वाघमारे, वसुदेव गायकवाड, यांच्यासह मान्यवर उपस्थित.**

# मुख्यमंत्री ग्रामसडक संशोधन योजने अंतर्गत ४० किमी सिमेंट रस्त्याला ६५ कोटी रुपयाचा निधी मंजुर

## आ.लक्ष्मण पवारांच्या प्रयत्नाला यश ; ग्रामीण भागात थिन व्हाईट टॉपिंगचा राज्यातील पहिलाच प्रयोग

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.लक्ष्मण पवार यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री ग्रामसडक योजना संशोधन व विकास अंतर्गत तालुक्यातील ७ गावच्या एकूण ४० कीमी रस्त्यासाठी थिन व्हाईट टॉपिंग नुसार ६५ कोटी रुपयांचा निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटने होणार असून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी होणारा हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग असून संबंधित गावच्या रस्त्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे.**

आ. लक्षण पवार यांच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामीण भागातील जवळपास सर्वच रस्त्याचे प्रश्न मार्गी लागले असून राहिलेल्या आणखी सात गावच्या ४० किमी



रस्त्यासाठी पुन्हा ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून हे सर्व रस्ते पूर्ण सिमेंट कॉक्रीटीकरण होणार असून लवकरच या रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. यामध्ये तलवाडा रोड ते रेवकी-देवकी व गोंदी या १२.२० किमी रस्त्यासाठी २७ कोटी रुपये, रामपुरी ते ढालेगाव या ४.७० किमी रस्ता ७ कोटी ४४ लक्ष रुपये, सुर्डी फाटा ते सेलू ३.५०.किमी रस्ता ५ कोटी २४ लक्ष रुपये, लोणाला फाटा ते खेर्डावाडी- सिंदफना चिंचोली ४.६० किमी रस्त्याला ६ कोटी ६८ लक्ष रुपये, जातेगाव रोड ते मुधापुरी ५.६१ किमी रस्त्याला ७ कोटी ९१ लक्ष रुपये, राष्ट्रीय महामार्ग (सावरगाव) ते चिखली ४.२० किमी रस्त्याला ६ कोटी २८ लक्ष रुपये, चकलांबा रोड ते ब्रम्हगाव ३.१० किमी रस्त्याला ४ कोटी ३९ लक्ष रुपये असा एकूण ४० किमी रस्त्यासाठी ६५ कोटी रुपयांच्या निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते थिन व्हाईट टॉपिंग नुसार पूर्णपणे सिमेंट कॉक्रीटीकरनाणे पूर्ण होणार आसून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग असून यामुळे हे रस्ते वर्षानुवर्षे टिकून राहतील असे सांगण्यात आले. दरम्यान येत्या दोन दिवसात या सर्व रस्ता कामाचे उदघाटन होणार आसून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांच्या कार्यालयाकडून कळवण्यात आले आहे.

# चिंचोलीमाळी विद्युत उपकेंद्राला ५ एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर मंजुर

केज । प्रतिनिधी

केज विधानसभेच्या आमदार नमीताताई - अक्षय मुंदडा यांच्या प्रयत्नातून चिंचोलीमाळी येथील विद्युत उपकेंद्रासाठी नवीन ५ एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर मंजुर झाला असुन यासाठी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत १ कोटी, ७० लाख, ५५ हजार ३५० रूपयांचा निधी मंजुर झाल्याचा व तांत्रिक मान्यता दिल्याचे आदेश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिले आहेत. सदरचा ट्रान्सफॉर्मर आर डी एस एस योजनेतून मंजूर आहे लवकरच टेंडर निघणार आहे त्यापूर्वीच डी पी डी सी मधून मंजूरी दिली आहे.

चिंचोलीमाळी उपकेंद्रातुन शेतीपंपासाठी तीनही फीडर वरुन आळीपाळीने पाच तास विजपुरवठा केला जात होता. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी पुरेसा विजपुरवठा होत नव्हता. व त्यामुळे गावठाणातील विजेचे भारनियमन करावे लागत होते. त्यामुळे केज विधानसभेच्या आमदार नमीताताई अक्षय मुंदडा यांच्या प्रयत्नातून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२४ २५ अंतर्गत १ कोटी, ७० लाख, ५५ हजार, ३५० रूपये खर्चाच्या ५ एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर मंजुर करण्यात आला आहे. त्यासंबंधिची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली असुन हे काम लवकरच सुरू होणार आहे. या ५ एमव्हिएच्या ट्रान्सफॉर्मर मुळे चिंचोलीमाळी विद्युत उपकेंद्रातुन तीनही फिडरवरुन शेतीपंपासाठी एकाच वेळी आठ तास अखंडीत विजपुरवठा होणार आहे. व गावठाणात करण्यात येणारे भारनियमन ही बंद होणार आहे.. यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपासाठी अखंडीत विज पुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे आमदार नमीताताई अक्षय मुंदडा, भाजपाचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, व युवानेते अक्षय मुंदडा यांचे यांचे जेष्ठ नेते सुनिलआबा गलांडेपाटील, जेष्ठ नेते रामकृष्ण घुलेकाका चेअरमन अरुणतात्या काळे, उपसरपंच धिरजराव वनवे, व्हाईस चेअरमन आबासाहेब केदार, डोक्याचे सरपंच गोरख भांगे, माजी सरपंच बापुराव भांगे, हातगाव चे उपसरपंच श्रीराम वायबसे, केवडचे सरपंच बाळासाहेब सत्वधर, चेअरमन गणेश सपाटे, टाकळी



चे माजी सरपंच रघुनाथ बारगजे, दगडु दळवे, दिलीप गायकवाड, रविंद्र गलांडे, राजाभाऊ नखाते, चंद्रकांत भुजबळ, मेजर हनुमंतराव वायबसे, गणेश वायबसे, भागवत वायबसे, बी. जी. गदळे, वैभव केंद्रे, अनंत कऱ्हाड, महादेव गिते, चत्रभूज वनवे, शरद कोल्हे, व्यंकट बारगजे, मुकादम गोरख बारगजे, मुकादम रघुनाथ बारगजे, जिवन बारगजे, सुरज घुले, राम घुले, प्रकाश बारगजे, विक्रम घुले, भागवत घुले, चंद्रकांत घुले यांच्याढसह चिंचोली (माळी) सारुकवाडी, डोका, हादगाव, केवड व टाकळीच्या ग्रामस्थांनी आभार मानले व अभिनंदन केले.

# बहुत फडफडा रहा है कबुतर,लेकीन माहोल बदलणे वाला है

## हजारो मुस्लिम कार्यकर्त्यांनी प्रवेश करत जयदत्त अण्णांना विजयी करण्याचा केला संकल्प

बीड । प्रतिनिधी

सर्व जातीधर्मांच्या लोकांना बरोबर घेऊन राजकारण समाजकारण करणाऱ्या माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचा संकल्प हजारो कार्यकर्त्यांनी केला आहे,बहुत फडफडा रहा है कबुतर,लेकीन माहोल बदलणे वाला है,दिल को देखो चेहरा न देखो,चेहरेने लाखो को लुटा है हे लक्ष्यात ठेवूनच आगामी काळात मुस्लिम समाज पाठीशी राहील असा विश्वास माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे

बार्शी रोडवर अमन लॉन्स येथे काल रविवारी मुस्लिम कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता, यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर,फईम सर,पत्रकार काझी मकदुम,नगरसेवक मुखींद लाला,सुलतान बाबा,जमिलभाई,ऍड शेख खाजा बॉस,मैनोद्दीन भाई,सुलेमान पठाण,कलंदर पठाण,कलंदर खान,सिराज खान,नसीर सरपंच, सय्यद मोसीन, रफी भाई,इरफान भाई,शेख पाशाभाई,इसा चौऊस,गुड्डू चौउस,जावेद कुरेशी,आदींची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी प्रास्ताविक मुखिद लाला यांनी केले,ते म्हणाले की, मुस्लिम समाजासाठीच नव्हे तर पूर्ण शहरासाठी अण्णांनी ज्या ज्या योजनेसाठी निधी उपलब्ध करून दिला त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडले शहर आणि ग्रामीण भागातील विकास कामे करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले होते सत्ता असो वा नसो त्यांनी आपल्या कार्यालयाचे दरवाजे कधी बंद केले नाहीत किंवा जनतेतील संपर्क कधी कमी केला नाही मुस्लिम समाजासाठी अनेक कामासाठी निधी उपलब्ध करून दिला याची साक्षीदार आपण आहोत मोमीनपुरा येथे आरोग्य सुविधा मिळावी यासाठी रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून दिली बागवान समाजाच्या सभागृहासाठी ५० लाखाचा निधी उपलब्ध करून दिला राजकारणात मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व मिळावे यासाठी आमदार नगरसेवक पदासाठी समाजातील तरुणांना संधी दिली सध्या अफवा पसरवून अण्णांच्या बाबतीत गैरसमज पसरवले जात आहेत त्यामुळे समाजाने दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध राहावे आणि या निवडणुकीत अण्णांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आव्हान त्यांनी केले



यावेळी व्यासपीठावरील उपस्थित फईम सर,काझी मकदूम,ऍड खाजा,जमील भाई, सुलतान बाबा,सुलेमान पठाण आदींनी आपले मनोगत व्यक्त केले माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,मेळाव्याच्या ठिकाणी आगमन झाले आणि मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू झाला एवढ्या मोठ्या पावसातही हजारो कार्यकर्ते उपस्थित राहिले हा शुभ शकुन आहे मला प्रत्येक निवडणुकीत हा समाज साथ देतो मागच्यावेळी काहींनी गैरसमज पसरवले आणि थोडक्या मताने मला थांबावे लागले पण हे करून समाजाचा काय फायदा झाला याचा कोणी विचार केला नाही सध्या अनेक जण उठा वेळी झाले आहेत गुटका मटका दारू टक्केवारीने जे लोक पुढे येऊ लागले आहेत ते तुमचे काय भले करणार?असा प्रश्न उपस्थित करून बहुत फडफडा रहा है कबूतर लेकिन माहोल बदलने वाला है असा आता म्हणू लागले आहेत, दिल को देखो चेहरा ना देखो चेहरे ने लाखो को लूटा है हे लक्षात ठेवा मी हक्काने मत मागतो कारण मी जे केलं ते समाजासमोर आहे कुठला निधी आणला तर तो थेट आपल्यापर्यंत पोहोचवला आहे त्यामुळे आगामी काळात आपण खंबीरपणे साथ द्यावी असे आव्हान त्यांनी केले यावेळी बीड शहरातील नजर चाचू मुन्नाभाई कलंदर पठाण यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह जाहीर प्रवेश केला

शहरातील अमन लॉन्सच्या मैदानात मुस्लिम कार्यकर्त्यांचा मेळावा सुरू झाल्यावर अचानक धो धो पावसाला सुरुवात झाली यावेळी बाजूच्या सभागृहातही बैठक व्यवस्था करण्यात आली होती भर पावसात उपस्थित कार्यकर्त्यांनी आपापल्या खुर्च्या हातात घेऊन सभागृहात येऊन बसण्याची व्यवस्था केली.अक्षरशः सभागृहात उभा राहायलाही जागा नव्हती,शेवटपर्यंत कार्यकर्त्यांचा उत्साह,आणि घोषणांनी सभागृह दणाणून गेले होते

# सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेच्या राज्यस्तरिय समितीच्या सदस्यपदी रविकांत राठोड यांची निवड



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत शासनाच्या अशासकीय समितींच्या तीन वर्षांसाठी निवडी करण्यात आल्या आहेत. यामध्ये संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेतर्गत असलेल्या राज्यस्तरिय समितीच्या सदस्यपदी बंजारा समाजाचे तरूण तडफदार नेतृत्व रविकांत राठोड यांनी सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून समाजाच्या हितासाठी कायम तत्पर राहून समाजहित जपणारे युवा नेतृत्व म्हणून रविकांत राठोड सिद्ध झालेले आहेत. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेतर्गत अप्पर मुख्य सविव/प्रधान सचिव/ सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये निवड करण्यात आली आहे. तांड्यासाठी स्वतंत्र्य ग्रामपंचायत स्थापन करणे, तांड्याला महसूली गाव घोषीत करणे व इतर अनुषंगिक कामे करणे यासाठी समाजातील नेतृत्व करणार्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये रविकांत राठोड यांचीही निवड करण्यात आल्याने सर्वस्तरातून त्यांचे कौतुक केले जात असून पुढील कार्यासह शुभेच्छा दिल्या जात आहे.

# माजी मंत्री महादेव जानकर यांचा बीड या ठिकाणी राष्ट्रीय समाज पक्ष कार्यकर्ता मेळावा संपन्न

## गेवराई विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले प्रा अण्णासाहेब मतकर यांना दिले महादेव जानकरंनी आशीर्वाद,

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय समाज पक्षाचा बीड येथे. माजी मंत्री महादेवजी जानकर साहेब कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला या मेळाव्यामध्ये जानकर साहेबांनी बीड मधील सर्व विधानसभा आपल्याला स्वबळावर लढायचे आहेत असे सांगितले ,व तसेच गेवराई विधानसभा बीड जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर हे लढतील. महाराष्ट्र मध्ये सध्या सर्वच पक्षाच्या जोरदार तयारी चालू आहेत त्यामध्ये राष्ट्रीय समाज पक्ष हा महाराष्ट्रातील २८८ जागा लढणार आहे तसेच बीड जिल्ह्यातील सर्व जागा ताकतीने लढणार आहे यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आपली ताकद पणाला लावून गटप्रमुख गणप्रमुख व प्रत्येक गावात कार्यकर्ते तयार केले आहेत ,त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्ष हा यावेळेस कोणाच्याही विश्वासावर न बसता स्वतः स्वबळावर लढणार आहे असे मत महादेव जानकर साहेब यांनी सर्वांना सांगितले आहे , व सर्व विधानसभा मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार तयार झालेले आहेत



प्रस्थापित पक्षावर जनता नाराज झालेली आहे कारण की प्रत्येकाने समाजाला फसवलं आहे समाजातील विकासाचे काम स अपेशी ठरले आहेत फक्त आश्वासन द्यायची आणि लोकांच्या दिशाभूल करायचे याच्यामध्ये पटाईत आहे त्यामुळे जनतेला नवीन पर्याय पाहिजे म्हणून मायबाप जनतेने राष्ट्रीय समाज पक्षासारख्या पक्षाला साथ देऊन येणाऱ्या काळातील आपला विकास करून घ्यावा या कार्यक्रमासाठी सर्व पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# बाबा सिद्दीकी हत्या आणि त्यावर उपस्थित विविध प्रश्नचिन्ह....?

**राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे वरिष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांची हत्या झाली आणि काल दफनविधी देखील झाला.त्यांची हत्या ही देशाला धक्का देणारी घटना ठरली. सगळीकडे दिवसभर एकच चर्चा होती बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची.महाराष्ट्र ते देशातील सर्वच समाज माध्यमावर या हत्येची कवरेज दिवसभर सुरू होती.आता याविषयावर सविस्तर प्रश्न आणि उत्तर शोधण्याचा प्रयत्न..**


**बाबा सिद्दिकी यांची हत्या समाजमाध्यमात लॉरेन्स बिष्णोई गँग यांनी केली असे दाखवीत आहे..सलमान खान जवळीकमुळे बाबा सिद्दिकी यांना मारले गेले असे दाखवीत आहे...**

**पण यावर काही उपस्थित प्रश्न -**

१ - सलमान खान च्या सर्वांत जवळ बाबा सिद्दिकी आहे का तर नाही..सलमान खान च्या घरात आणि नात्यात १०० पेक्षा अधिक व्यक्ती असतील...सलमान खानचे दोन्ही बंधू दोन्ही बहिण हे कोणत्याही सुरक्षे वीणा फिरतात मग त्यांच्यावर हल्ला का झाला नाही... सलमान खानच्या इतर नात्यातील लोक सुद्धा वीणा सुरक्षा कुठेही रस्त्यावर बिनधास्त फिरतात मग त्याच्यावर का हल्ला नाही..

आता मित्र बघा सलमान खानचा सर्वात जवळचाच मित्र बाबा सिद्दीकी नव्हते...त्यांचे एकदम जवळचे कित्येक मित्र आहे त्यांच्यावर देखील कधी हल्ला नाही...बॉलिवूड क्षेत्रात तर सलमान खान शिवाय पान ही हीलत नाही.. कित्येक कलाकार लोंकाचे घरचं त्यांच्या जीवावर सुरू आहे...कित्येक मोठ मोठे बॉलिवुड कलाकार हे बोलून दाखवतात की आम्ही दिवसरात्र सलमान खानच्या घरी पडलेलो असतो..मग या कलाकार वर देखील कधी हल्ला नाही...उद्योग क्षेत्रातील अंबानी पासून ते राजकिय क्षेत्रातील ममता बॅनर्जी असो किंवा नरेंद्र मोदी असो त्यांच्यासोबत देखील सलमान खानची मैत्री...

मग सलमानच्या नावाने



बाबा सिद्दीकी यांनाच का टार्गेट करण्यात आले...दुसरा मुद्दा दाउद इबराहिम यांचे संबंध जोडण्यात आले त्यामुळे हत्या..पण दाउद इब्राहीम गांगवयांनी सुद्धा एकेकाळी त्यांना धमकी दिली होती..मग त्यांचे त्या गँगशी कशे संबंध...ज्या लॉरेन्स बिष्णोई गँगचे नाव यात आले तो तर गुजरातच्या साबरमती जेल मध्ये बंद आहे ही हत्या त्याने केली का उगीच त्याच्या नावावर बंदूक ठेवून हत्याला एक वेगळ्या वळणावर नेले जात आहे...लॉरेन्स बिष्णोईला यामुळे देशात मोठी प्रसिद्धी मिळत आहे..कदाचित तो तर ही प्रसिद्धी पाहून तो संबंधित नसेल तरी संबधित आहे असे सांगेल...कारण त्यामुळे त्याला आता देशात दाउद इब्राहीम च्या कदाचा डॉन आहे असे दाखविले आणि प्रसेंट केले जात आहे...बाबा सिद्दिकी हे मोठे व्यवसायिक होते आणि मोठे बिल्डर होते.. प्रॉपर्टी डीलिंग संबधित होते...मागे डठ- प्रकल्प वरून देखील काही बिल्डर यांनी त्यांना धमकी दिली होती...

१५ दिवस अगोदर देखील त्यांना धमकी देण्यात आली होती ती कोणी दिली होती एखादा बिल्डर की बिष्णोई गँग याचा खुलासा मुंबई पोलिस करतील...बाबा सिद्दिकी राजकीय क्षेत्रात अताच काही महिन्यांपूर्वी अजित पवार गटात दाखल झाले होते..त्यांचा मुलगा आमदार जिशान सिद्दीकी यांचा देखील पक्ष प्रवेश आज किंवा उद्या होता..हत्येमागे यात देखील कारण असेल का...पण बिष्णोई गँगचे नाव घेऊन हे हत्येकरी मुख्य मोठ्या अपराधीला तर वाचवणार नाहीत ना हा देखील प्रश्न...खरच बिष्णोई गँग या हत्येमागे आहे का की कोणी व्यवसायिक आणि राजकीय वादातून त्यांची हत्या केली आणि हे सगळे प्रकरण एक वेगळ्या वळणावर नेण्याचा प्रयत्न करत आहे असे देखील झाले नाही पाहिजे...तपास योग्य दिशेने जाऊन मुख्य ते मारेकरी समोर आले पाहिजे..हीच अपेक्षा.

# आ. क्षीरसागर शंभर टक्क्यांनी नापास - एस.एम.युसूफ

## बिंदुसरा नदीवरील पुलाचा आणि महेदवीया दायरा कब्रस्तान च्या संरक्षक भिंतीचा प्रश्न सोडवलाच नाही

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मोमीनपुरा-खासबाग जोडणाऱ्या बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाचा प्रश्न तसेच मोमीनपुरा भागातील महेदवीया दायरा कब्रस्तान च्या दोन भिंती बांधून देण्याचा प्रश्न आमदार म्हणून संदीप क्षीरसागर यांना सोडवायला दिले होते पण हे दोन्ही प्रश्न ते त्यांच्या कार्यकाळात सोडवू शकले नाहीत. यामुळे आ. क्षीरसागर हे शंभर टक्क्यांनी नापास झाल्याचे हे दोन्ही प्रश्न मांडणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, कुरेशी मुहल्ला, मोमीनपुरा, मुहम्मदिया कॉलनी, बीड मामला या भागातील बहुसंख्य नागरिकांना विविध कामांसाठी शहरात येण्याकरिता जवळचा असलेला मार्ग हा बिंदुसरा नदी मधूनच येतो. जिल्हा रुग्णालयासह अनेक खाजगी दवाखान्यात जाणारे रुग्ण, विविध शैक्षणिक संस्था म्हणजेच शाळा महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी व शिक्षक, फ्रुट आडत मार्केट-भाजी मंडईत जाणारे विक्रेते आणि ग्राहक, बस स्टॅन्ड ला जाणारे-येणारे प्रवासी तसेच मोमीनपुरा भागातील मोठ्या कापड मार्केटमध्ये खरेदीसाठी जाणारे-येणारे ग्राहक बिंदूसरा नदीमधील याच मार्गाचा उपयोग करतात. हा मार्ग कच्चा असला तरी वर्षातील सात-आठ महिने येथून नागरिक पायी, सायकल, मोटरसायकल, ऑटो रिक्षा, चार चाकी वाहने आदींमधून ये-जा करतात. पावसाळ्यात जेव्हा नदीला पाणी येते तेव्हा मात्र हा जवळचा मार्ग बंद होऊन जातो. म्हणून नागरिकांना मोठा वळसा घेऊन बार्शी रोड मार्गे किंवा जुना बाजार मार्गे आणि दगडी पुलावरून जर पाणी वाहत असेल तर मग आंबेडकर पुतळा मार्गे मोठा वळसा घेऊन ये-जा करावी लागते. ही बाब लक्षात घेऊन खासबाग-मोमीनपुरा जोडण्यासाठी पुलाचे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे देण्यात आलेला आहे. त्यावर कार्य व्हावे आणि हा नियोजित पूल तयार व्हावा, याकरिता आतापर्यंत दोन वेळा बिंदुसरा नदीमध्ये डुबकी लगाव आंदोलन केलेले आहे. यामुळे आमदारांना खळबळून जाग आली आणि त्यांनी फक्त कागदपत्रे घेऊन कधी अजित पवार तर कधी जयंत पाटलांना या प्रश्नी भेट घेतल्याचे तसेच पूल कम बंधारा बांधण्याची मोठ्या प्रमाणात हवा निर्माण केली परंतु त्यांचा कार्यकाळ संपला तरी त्यांना हा पूल बांधून घेता आला नाही. हा प्रश्न नव्वद गुणांचा होता परंतु तो त्यांना सोडवता आला नाही. दुसरा प्रश्न होता मोमीनपुरा भागात असलेल्या साडेचारशे वर्षांचा इतिहास लाभलेल्या ऐतिहासिक महेदवीया दायरा कब्रस्तान च्या दोन भिंती जीर्ण होऊन जमीन दोस्त झाल्याचा. त्या आमदार फंडातून बांधून द्याव्या याकरिता सुद्धा आमदार क्षीरसागर यांच्याकडे प्रश्न मांडला होता. यामुळे त्यांनी २३ जानेवारी २०२३ रोजी आपल्या लवाजम्यासह कब्रस्तानात येऊन पाहणी केली. संरक्षक भिंत बांधून देण्याचे आश्वासन दिले. त्याला आता पावणेदोन वर्षे झाली तरीही कब्रस्तानची संरक्षक भिंत त्यांना काही बांधून देता आली नाही. हा प्रश्न फक्त दहा गुणांचा होता, तरीही तो त्यांना सोडवता आला नाही. अशाप्रकारे हे दोन्ही प्रश्न त्यांच्या जवळपास संपलेल्या कार्यकाळात त्यांना सोडविता न आल्याने ते शंभर टक्क्यांनी नापास झाल्याचे हे दोन्ही प्रश्न मांडणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT